# समाज व्यवस्थेचा आत्मा : नाती गोती

डॉ. चौधरी एन. डी.
प्रोफेसर, समन्वयक,
मराठी संषोधन केंद्र
आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा
ता. आश्टी जि. बीड 414 202

**प्रस्तावणाः**

मनुश्य हा समाजषील प्राणी आहे. त्यास समुहाने राहणे आवडते. समुहाने राहण्यास प्राचीन काळात सुरुवात केल्यानंतर ‘समाज’ निर्मिती झाली. समाज रचनेचा गाभा ‘नाती गोती’ होत. इतरांच्या सहवासात राहिल्यामुळे त्याचे जगणे बंधयुक्त होते. संस्कृतीने समाज मान्यतेने सिध्द केलेल्या आचारविचार, नाती कल्पना, भाशा, व्यवसाय, देवता, यांचे आचरण आणि पालन करणे प्रत्येक मानवाची जबाबदारी असते. यास लोकमान्यता असते. समुहाचा कुटुंब हा घटक अत्यंत महत्वाचा मानला जातो. या कुटुंबाद्वारेच नाती गोती निर्माण होतात. या नाते गोत्याचे स्वरुप आणि वैषिश्ट्ये काय आहेत. नाते संबंध कसे निर्माण होतात? त्यांचा प्रत्यक्ष संबंध कोणत्या व्यक्तीषी येतो? अषा प्रष्नांचा मागोवा घेत असताना लेखकास ‘‘समाज व्यवस्थेतील नाती गोती’’ या विशयावर विचार व्यक्त करण्याची इच्छा झाली. त्यातून प्रस्तूत षोध निबंधाने आकार घेतला. या षोध निबंधाची उदिश्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

**षोध निबंधाची उदिश्ट्येः**

प्रस्तूत षोध निबंधाचा रचनाबंध सिध्द करताना खालील प्रमाणे उदिश्ट्ये ठरवून विशयाचे स्पश्टीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

1. मानवी समुहाची समुह रचना स्पश्ट करता येईल.
2. सामुहिक जीवनपध्दतीतून नाती गोती कषी सिध्द होतात हे मांडता येईल.
3. नाती गोतीचे प्रकार स्शश्ट करता येतील.
4. नाती गोतीचे समाजातील स्थान निष्चित करता येईल.
5. समाज व्यवस्थेचा आत्मा नाती गोती कसा हे स्पश्ट करता येईल.

**षोध निबंधाचे विष्लेशणः**

मनुष्यास समुहाने राहणे अधिक आवडते. आपण प्राचीन इतिहास अनुभवला! वाचला तर आपल्या असे लक्षात येईल. मानवी समुह नद्यांच्या काठावर वस्ती करुन राहू लागल्यानंतरच त्यांची संस्कृती सिध्द झाली. कुटुंब हे मानवी समुहातील महत्वाचे अंग होय. कुटुंब विवाह विधीने निर्माण होते. कुटुंब समुहाषी संस्कृतीतील आचार विचार, नीती कल्पना, नाती गोती, भाशा, पेहराव, खानपानाच्या पध्दती यांचेषी बंधयुक्त असते. विषिश्ट गावाची/पाड्याची किंवा वाडी, तांड्याची जीवन पध्दती सामुहिक असते. कुटुंब व्यवस्थेमध्ये ‘नाती गोती’ अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो. यासंबंधी डॉ. केसिंग म्हणतात, ‘‘सामाजिक संघटनेचा गाभा म्हणजे नाती गोती होय’’[1]. मनुश्य समाजषील प्राणी असल्याने तो सतत इतरांच्या सहवासात राहणे पसंद करतो. त्याचे जगणे प्रदेष, पषुपक्षी, प्राणी, वृक्ष वेली, मातीषी एकनिश्ठ असते. ही नाती गोती वंषपरंपरा, रक्तसंबंध आणि

विवाह यामुळे निर्माण होतात. त्यास समाज मान्यता असते. समुहाची मान्यता असल्याषिवाय कोणतेही नाते संबंध निर्माण होत नाहीत. कुटुंब व्यवस्थेचा मुलाधार म्हटले तरी चालेल. ''व्यक्ती संबंधीची व्यवस्था म्हणजे आत्मसंबंध/नाती गोती'' होय.[2]

**षोध निबंधाचा पूर्व षोध :**

समाजातील नाते संबंधाचा षास्त्रषुध्द अभ्यास खालील विचारवंतानी प्रथम केला.

नाते संबंध यांचा अभ्यास 19 व्या षतकात करण्यास प्रारंभ झाला. लुई मार्गन या अमेरिकन मानवषास्त्रज्ञाने नाते संबंधाचा पाया घातला. रिव्हर्स, कोबर, रॅडक्लिप, ब्राऊन, लोवी या पाष्चात्य विचारवंतानी भर घातली. भारतात गो. स. घुर्ये, डॉ. इरावती कर्वे यांनी सखोल अभ्यास केला. यानुसार नाते संबंधाचे विस्तृत विष्लेशण करता येईल.

1. रक्त संबंधामुळे निर्माण होणारी नाती अनुवंषीकतेनेही निर्माण होतात. माता–पिता, भाऊ–बहीण अषी नाती यामध्ये गणली जातात. चुलता–चुलती, काका, आत्या, पुतण्या, पुतणी ही नाती.

2. विवाह संबंधाने निर्माण होणारी नाती गोती विवाह हा समाज व्यवस्थेचा मूलगाभा होय. स्त्री आणि पुरुश यांचा समाजातील आप्तेश्ट, नातेवाईक, मित्र परिवार यांचे साक्षीने विवाह संपन्न होतो. यास समाज मान्यता असते. विवाह विधीमध्ये दोन कुटुंबातील वर आणि वधू यांचा विधीवत विवाह संपन्न होतो. यामुळे अनेक प्रकारची नाती निर्माण होतात. विवाहानंतर वराचे सासू, सासरा, मेव्हणा, मेव्हणी, साडू असे नाते निर्माण होते. वधूचे सासू, सासरा, ननंद, भावजय, दीर, भाचा असे नाते संबंध तयार होतात.

3. समाज मान्य नाते संबंध : समाजामध्ये काही कल्पित नाते संबंध गृहीत धरले जातात. हे नाते वरील नात्या पेक्षा भिन्न असते. गुरुपिता, गुरुमाता, गुरुभाव, मानलेले आईवडील असे नाते असते. जन्मदात्या आई–वडीलांपेक्षा कधी कधी हे नाते श्रेश्ठ ठरते. गुरुभाऊ हे नाते आजही समाजात टीकुन आहे. सख्या भावाप्रमाणे गुरुभाऊ–बहिणीचे नाते असते. ते समाजमान्य असते. वरील विष्लेशणाप्रमाणे या नाते संबंधात समाज मान्यता असते.

**आत्मसंबंध व्यवस्थेचे महत्वः**

कुटुंब व्यवस्थेत पती आणि पत्नी यांना विवाह विधीने सामाजिक दर्जा प्राप्त झाल्यानंतर अपत्य निर्मिती, कुटुंबातील स्त्री (लक्ष्मी) चे पालन पोशण, मुलांचे संगोपण, त्यांचे जीवन घडवण्यासाठी त्यांचेवर केले जाणारे संस्कार कुटुंबातच होतात. समाजातील नाती गोती त्या समाजाच्या आचारविचार, नीती कल्पना, भाशा यांच्याषी बांधील असतात. हे नाते अत्यंत काळजी पुर्वक सांभाळले जाते. कुटुंब व्यवस्थेतील प्रमुखांना आहो जाहो बोलून त्यांचा मान राखला जातो. जावई हे नाते अत्यंत नाजूक असते. जिव्हाळा, प्रेम, आपुलकी, नातेसंबंधाची जपणूक करण्यास महत्वाची भूमिका बजावत असतात. नाती गोती सर्वच ठिकाणी सारखी नसतात. भौगोलिक क्षेत्र, मानवी समुह, वंष परंपरा या नुसार त्यांचे स्वरुप निष्चित होत असते. मानवी समुहामध्ये आचार विचार आणि नीती कल्पना महत्वाच्या मानल्या जातात. म्हणूनच नाती गोती समाजात अत्यंत महत्वाची व्यवस्था मानली जाते.

**नाती गोतीतील चाली रीतीः**

नाते संबंध हे नाजूक असतात. जपले तर पाळीव प्राणीही जीव लावतात असे म्हटले जाते. कुटुंबात स्त्री जीवनात सासू–सून, ननंद–भावजय, आई, पत्नी अषी अनेक नाती असतात. मुलगी (वधू) सासरी नांदण्यास विवाहानंतर येते. सासू जर आईची माया देणारी असेल तर ती सुखी जीवन जगते नसता तिचे सासूरवासाने जीवन अंधारुन जाते. जीवनात काहीही

स्वारस्य उरत नाही. माहेर सोडून आई वडिलांचा त्याग करुन नववधू पती घरी आलेली असते. परक्या नवीन लोकांषी ओळख नसते. यावरुन तिचे जगणे वेदनेने भरलेले असते.

**सारांषः**

संस्कृतीतील नाती गोती जणू काही काचेचे भांडे असते. ते जपावे लागते. वागण्या—बोलण्यात संयम ठेवून वागावे लागते. काही अधिकार वाणीचे असतात. तर काही मनोरंजनाचे, चेश्टेचे नाते सांगणारे असतात. समाजात अलीकडे जागरुकता आल्यामुळे, जगजागृती झाल्यामुळे नाती—गोती अधिक धूसर दिसताना जाणवतात. काही नाती संस्कृतीतून हद्पार झालेली आढळतात. समाजात साटेलोटे हा विवाह विधीचा प्रकार अलीकडे कमी होऊ लागला आहे. समाजातील लोक विवाहविधी निमित्त प्रचंड खर्च करुन पार पाडू लागली आहेत. नातेसंबंध निर्माण जसे केले तसे पार पाडणे महत्वाचे असते. हे नाते संबंध कधीही नश्ट न होणारी प्रक्रिया असून तिची जपणूक करणे आज गरजेचे वाटते. संस्कृती टीकवायची असेल तर नाते जपावे लागते.

**संदर्भ**


1- भारतीय सामाजिक सरंचना पृश्ठ 38

2- भारतीय समाज, य.च.म.मु.वि. पृश्ठ 79